जयवंत प्रतिष्ठान हुमगाव संचलित

**आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा**

ता. जावली, जि. सातारा

दि. १० /१२/२०१९

# नोटीस

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, आपल्या महाविद्यालयामध्ये Kadam Tours & Travel व आपले महाविद्यालय यांच्याशी झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार गुरुवार दि. १२/१२/२०१९ रोजी स. ठीक ११:०० वा. "सहली आणि रोजगार संधी" या विषयावर Kadam Tours & Travel चे प्रो. प्रा. अमित कदम यांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी आपण या करिता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये उपस्थित रहावे.

प्राचार्य

डॉ. प्रमोद घाटगे

Principal
Amdar Shashikant Shinde Mahavidyalay
Medha,Tal.Jaoli, Dist.Satara

उद्यमेन हि सिध्यन्ति: कार्याणि न मनोरथै: NAAC 'B+' Grade

Jaywant Pratishthan Humgaon Sanchalit,

# Amdar Shashikant Shinde Mahavidyalay, Medha

Tal- Jawali, Dist- Satara

**President: Hon. M.L.A. Shashikant J. Shinde**

**I/C Principal: Dr. Pramod Ghatage**

**(M.A., Ph.D.)**

**Estd. 2002**

Office: 02378-285645, Email: accmedha@yahoo.com, Web: www.assmmedha.edu.in

Ref. No.: Date: / /

प्रति,

मा. अमित कदम

Kadam Tours & Travel

सातारा

विषय: व्याख्यानास उपस्थित राहाणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, आपल्यामध्ये झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार आमचे महाविद्यालयामध्ये गुरुवार दि. १२/१२/२०१९ रोजी स. ठीक ११:०० वा. “सहली आणि रोजगार संधी” या विषयावर आमचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणेकरिता आपण उपस्थित रहावे हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

Principal
Amdar Shashikant Shinde Mahavidyalay
Medha,Tal.Jaoli, Dist.Satara

उद्यमेन हि सिध्यन्ति: कार्याणि न मनोरथै:

NAAC 'B⁺' Grade

Jaywant Pratishthan Humgaon Sanchalit,

**Amdar Shashikant Shinde Mahavidyalay, Medha**

Tal- Jawali, Dist- Satara

**President: Hon. M.L.A. Shashikant J. Shinde**

**I/C Principal: Dr. Pramod Ghatage**

(M.A., Ph.D.)

Estd. 2002

Office: 02378-285645, Email: accmedha@yahoo.com, Web: www.assmmedha.edu.in

Ref. No.: Date: / /

## *Letter of Gratitude*

प्रति,

मा. अमित कदम

Kadam Tours & Travel

सातारा

विषय: उपस्थितपत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, आपल्यामध्ये झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार आपण आमचे महाविद्यालयामध्ये गुरुवार दि. १२/१२/२०१९ रोजी "सहली आणि रोजगार संधी" या विषयावर आमचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याबद्दल आपले आमचे महाविद्यालायातर्फे आभार असेच आपले सहकार्य आमचे महाविद्यालयास मिळावे.

कळावे,

आपला विश्वासू

Principal

Amdar Shashikant Shinde Mahavidyalay

Medha,Tal.Jaoli, Dist.Satara

जयवंत प्रतिष्ठान हुमगाव संचलित

**आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा**

ता. जावली, जि. सातारा

**"सहली आणि रोजगार संधी"**

गुरुवार दि. १२/१२/२०१९

**अहवाल:**

Kadam Tours & Travel व आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार गुरुवार दि. १२/१२/२०१९ रोजी स. ठीक ११:०० वा. "सहली आणि रोजगार संधी" या विषयावर Kadam Tours & Travel चे प्रो.प्रा. अमित कदम यांचे विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य अध्यक्ष स्थानी होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व व्याख्याते मा. अमित कदम त्यांच्या व्याख्यानात म्हणाले, आता ऐतिहासिक स्थळे, प्रेक्षणीय स्थळे, गडकिल्ले, समुद्रकिनारे, विविध संग्रहालये, वैज्ञानिक अभ्यास केंद्रे तसेच वाचनालये, कारखाने अशा विविध स्थळांवर शैक्षणिक सहली नेल्या जातात. आता हा ट्रेंडसुद्धा बदलत आहे. शाळांच्या सहली वॉटर पार्क, समुद्रकिनारी काढल्या जात आहेत. आता याचे अनुकरण छोट्या शहरातील शाळादेखील करू लागल्या आहेत. हा नवा ट्रेंड पर्यटनवाढीसाठीसुद्धा उपयुक्त ठरत आहे. यामुळे मुलांना नवनवीन ठिकाणे पाहायला मिळण्याबरोबरच राज्यात पर्यटन वाढीला मदत होत आहे. शैक्षणिक सहली पूर्वीपासून विविध ऐतिहासिक स्थळे, शैक्षणिक किंवा औद्योगिक संकुले, कारखाने, वस्तुसंग्रहालये, गडकिल्ले, वैज्ञानिक अभ्यास केंद्रे आदी ठिकाणी नेल्या जातात. याबाबत विद्यार्थ्यांनादेखील उत्सुकता निर्माण होते. पुस्तकात वाचत असलेले स्थळ समोर पाहताना विद्यार्थ्यांची उत्सुकता जागी होते.

ऐतिहासिक स्थळांमधून प्रेरणा मिळते, इतिहास माहिती होतो किंबहुना ऐतिहासिक घटना विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोरून तरळून जातात. कारखान्यात कोणती वस्तू कशी बनते, हे पाहताना विद्यार्थ्यांना उत्सुकता निर्माण होते. अशा शैक्षणिक सहलींमधून मुलांच्या अभ्यासात आणि बुद्धीत आणखी भर पडते. सहलींद्वारे आपल्या सवंगड्यांसह पर्यटनाचा आनंद लुटता येतो. त्यामुळे विद्यार्थीही सहल म्हटल्यावर जाम खूश असतात. आजही अनेक ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांचा कल हा ऐतिहासिक स्थळे पाहण्याकडेच अधिक प्रमाणात आहे. सहलीतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांनाही वाव मिळतो. मुक्कामाच्या ठिकाणी सांस्कृतिक सादरीकरण केले जाते. त्यातून मुलांना आनंद मिळण्याबरोबरच त्यांच्यामध्ये एकोपा वाढतो, जवळीक वाढते व त्यांच्या कलागुणांना सादरीकरणासाठी एक व्यासपीठही मिळते. यामुळे आता या सहली विद्यार्थ्यांच्या मौजमजेच्या होत चालल्या आहेत. शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यापूर्वी शिक्षण विभागाकडून पूर्वपरवानगी काढणे गरजेचे असते. त्या परवानगीनंतर सहलीची जबाबदारी ही त्या शाळेची असते. ग्रामीण भागातील शाळांतील विद्यार्थी, शाळा आर्थिक विवंचनेला तोंड देत सहलींचे आयोजन करतात. सहलींचा बदलता ट्रेंड पाहता सहली काढताना शाळांकडे पुरेसा कर्मचारीवर्ग देखील उपलब्ध नसतो. एका सहलीमध्ये अनेक मुलांचा समावेश असतो, मात्र त्या मानाने शिक्षकांची संख्या कमी असते. त्यामुळे सहली काढताना पुरेसा शिक्षक व कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल यावर लक्ष देणे गरजेचे आहे. शाळांकडून सहली काढताना खासगी वाहनांचा तसेच एसटी बसेसचा वापर केला जातो. महाराष्ट्र ही ऐतिहासिक, सांस्कृतिक भूमी आहे. या भूमीमध्ये अनेक राजे, संत, विचारवंत, वैज्ञानिक, लेखक घडले आहेत. अशा महाराष्ट्रात गडकिल्ले, पुरातन मंदिरे, तलाव, लेणी, ब्रिटिशकालीन वास्तू, समुद्रकिनारे, संग्रहालये, लेण्या, जंगले आदी मोठ्या प्रमाणात आहेत.

राज्य शासन व केंद्र शासनाने अलीकडे पर्यटनवाढीवर मोठा भर दिला आहे. त्यासाठी दोन्ही शासनांनी स्वतंत्र पर्यटन विभाग सुरू केले आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळही राज्याच्या पर्यटन वाढीत महत्त्वाचे योगदान देत आहे. शैक्षणिक सहली काढताना पर्यटन विकास महामंडळाचे संकेतस्थळ पाहिल्यास त्याचा उपयोग होऊ शकेल. राज्यातील वेगवेगळ्या पर्यटनस्थळांची माहिती त्यावर उपलब्ध आहे. शिवाय तिथे कसे पोहोचायचे याचीही माहिती आहे. कुठेही शालेय सहली नेताना शिक्षकांनी त्या स्थळांचा अभ्यास करणे व विद्यार्थ्यांना त्याची पूर्व माहिती देणे गरजेचे आहे. जेणेकरुन आपण नेमके काय पाहणार आहोत याची विद्यार्थ्यांना पूर्वकल्पना मिळते व ते त्या त्या स्थळाविषयी अधिक माहिती मिळण्यासाठी प्रयत्न करतात. शिवाय त्या त्या स्थळावर गेल्यानंतर पूर्वमाहिती असल्याने अधिकची माहिती मिळविण्यातही त्याचा उपयोग होऊ शकतो. अशा पद्धतीने सहलींचे नियोजन केल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात मोठा फायदा होऊ शकतो. सहली ही ज्ञानवाढीची एक सुवर्णसंधी असते. यामुळे पर्यटनवाढ व रोजगार निर्मितीही होते. त्यामुळे सहलीची सुवर्णसंधी शालेय विद्यार्थ्यांनी साधणे गरजेचे आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांना आर्थिक तरतूद करून मुलांना सहलींवर पाठवावे. शिक्षकांनी सहलींचे अभ्यासपूर्ण नियोजन करावे. असे नियोजनबद्ध नियोजन केल्यास शैक्षणिक सहली या विद्यार्थ्यांच्या ज्ञान वाढीच्या कार्यात महत्वाचे योगदान देऊ शकतात.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य त्यांच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, सध्या कृषी पर्यटन व त्यामधून ग्रामीण जीवनाला योग्य कलाटणी मिळालेली आहे. ग्रामीण भागात रोजगार वाढीच्या संधी वाढल्या आहेत.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. विनोद पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या वेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विध्यार्थिनी उपस्थित होते.

डॉ. विनोद पवार
(भूगोल विभाग)

प्राचार्य
Principal
Amdar Shashikant Shinde Mahavidyalay
Madha Tal Jaoli, Dist Satara

# *Photographs*






जयवंत प्रतिष्ठान हुमगाव संचलित

**आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा**

ता. जावली, जि. सातारा

---

दि. ०५/०८/२०२१

# नोटीस

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, आपल्या महाविद्यालयामध्ये Kadam Tours & Travel व आपले महाविद्यालय यांच्याशी झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार सोमवार दि. ०९/०८/२०२१ रोजी स. ठीक ११:०० वा. "कृषी पर्यटन व ग्रामीण पर्यटनातील संधी" या विषयावर Kadam Tours & Travel चे प्रो. प्रा. अमित कदम यांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी आपण या करिता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये उपस्थित रहावे.

प्राचार्य

डॉ. प्रमोद घाटगे

Principal

Amdar Shashikant Shinde Mahavidyalay

Tal Jaoli, D

उद्यमेन हि सिध्यन्ति: कार्याणि न मनोरथै:

NAAC 'B+' Grade

Jaywant Pratishthan Humgaon Sanchalit,

**Amdar Shashikant Shinde Mahavidyalay, Medha**

Tal- Jawali, Dist- Satara

**President: Hon. M.L.A. Shashikant J. Shinde**

**I/C Principal: Dr. Pramod Ghatage**

**(M.A., Ph.D.)**

Estd. 2002

Office: 02378-285645, Email: accmedha@yahoo.com, Web: www.assmmedha.edu.in

Ref. No.: Date: / /

***Letter of Gratitude***

प्रति,

मा. अमित कदम

Kadam Tours & Travel

सातारा

विषय: उपस्थितपत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, आपल्यामध्ये झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार आपण आमचे महाविद्यालयामध्ये सोमवार दि. ०९/०८/२०२१ रोजी स. ठीक ११:०० वा. "कृषी पर्यटन व ग्रामीण पर्यटनातील संधी" या विषयावर आमचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याबद्दल आपले आमचे महाविद्यालायातर्फे आभार असेच आपले सहकार्य आमचे महाविद्यालयास मिळावे.

कळावे,

आपला विश्वासू

Principal

Principal

Amdar Shashikant Shinde Mahavidyalay

Medha, Tal.Jaoli, Dist.Satara

उद्यमेन हि सिध्यन्ति: कार्याणि न मनोरथै:

NAAC 'B+' Grade

Jaywant Pratishthan Humgaon Sanchalit,

**Amdar Shashikant Shinde Mahavidyalay, Medha**

Tal- Jawali, Dist- Satara

**President: Hon. M.L.A. Shashikant J. Shinde**

**I/C Principal: Dr. Pramod Ghatage**

**(M.A., Ph.D.)**

Estd. 2002

Office: 02378-285645, Email: accmedha@yahoo.com, Web: www.assmmedha.edu.in

Ref. No.: Date: / /

प्रति,

मा. अमित कदम

Kadam Tours & Travel

सातारा

विषय: व्याख्यानास उपस्थित राहाणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते कि, आपल्यामध्ये झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार आमचे महाविद्यालयामध्ये दि. ०९/०८/२०२१ रोजी स. ठीक ११:०० वा. "कृषी पर्यटन व ग्रामीण पर्यटनातील संधी" या विषयावर आमचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणेकरिता आपण उपस्थित रहावे हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

Principal
Amdar Shashikant Shinde Mahavidyalay
Medha, Tal.Jaoli, Dist.Satara

जयवंत प्रतिष्ठान हुमगाव संचलित

**आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा**

ता. जावली, जि. सातारा

**कृषी पर्यटन व ग्रामीण पर्यटनातील संधी**

सोमवार दि. ०९/०८/२०२१

---

**अहवाल:**

आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा व Kadam Tours & Travel यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य (MoU) करारानुसार सोमवार दि. ०९/०८/२०२१ रोजी स. ठीक ११:०० वा. "कृषी पर्यटन व ग्रामीण पर्यटनातील संधी" या विषयावर Kadam Tours & Travel चे प्रो.प्रा. अमित कदम यांचे विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य अध्यक्ष स्थानी होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व व्याख्याते मा. अमित कदम त्यांच्या व्याख्यानात म्हणाले, शेती, ग्रामीण जीवन आणि पर्यटन यांचा समन्वय म्हणजे कृषी पर्यटन. शाश्वत पर्यटनात अग्रस्थानी आणि पर्यटन रोजगार वाढीस बळकटी देणारा एक पर्यटन प्रकार. १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती, गारपीटं, वादळं, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे, शेती व शेतकी रोजगारांमध्ये घट होताना दिसून येत आहे. गतवर्षातील शेती व्यवसायातील झालेली घट बघता येत्या काळात कृषी पर्यटन हा शेतकऱ्यासाठी पर्यायी उत्पन्न मिळवून देणारा मार्ग ठरेल. परिणामी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (MTDC) गांभिर्याने विचार करून २०१६ च्या पर्यटन धोरणामध्ये कृषी पर्यटनाचा विचार केलेला दिसतो आहे.

आज शेतीच्या पुनरुज्जीवनासाठी व वाढीसाठी, कृषी व ग्रामीण पर्यटनाची गरज आहे. या कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांसाठी स्थानिक बाजारपेठ व इतर रोजगाराची संधी उपलब्ध होईल. तसेच शेतीसोबत जोडधंदा आणि त्यातून पर्यायी व अतिरिक्त उत्पन्न शेतकऱ्यास होईल. ग्रामीण व स्थानिक रोजगारामध्ये वृद्धी होऊन, बेरोजगार, कुशल व अकुशल श्रमिकांना स्थानिक परीसरामध्येच काम व मोबदला मिळेल. गावातील सोयी-सुविधांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होईल. शेतकरी व गावाच्या सर्वांगीण विकासासोबत लोकांचा अभिमान वाढेल आणि स्थनिक वारसा, इतिहास, चालीरिती इत्यादीबद्दल सर्वांना माहिती होईल. शिवाय लघुउद्योग-कुटिरोद्योगास चांगली दीर्घकाळ चालना मिळेल. पर्यटकांसाठी शेती व शेतीविषयक कार्याचे आकलन होण्यासाठी व त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी कृषी पर्यटन हा उत्तम पर्याय आहे. पुस्तकांत किंवा चित्रपट व सोशल मीडियामध्ये दिसणाऱ्या शेतीतील गोष्टींना स्वानुभवाने आत्मसात करता येईल. लहान मुलांना झाडावर चढणं, आंबे व फळे काढणं, म्हैशीच्या पाठीवर बसून फेरफटका मारणं, शेतातील भाजी काढणं, पक्षी-प्राणी निरीक्षण करणं, पाटातील पाण्यात किंवा पाळीव प्राण्यांसोबत मनसोक्त खेळणं यासारख्या गोष्टींचा अनुभव ही घेता येईल. शिवाय मोठ्यांना चुलीवरचे जेवण, ताजी भाजी-फुले-फळे, शुद्ध हवा, मानसिक शांतीसाठी आवश्यक अशी शांतता, झाडाखाली सावलीतील किंवा मचाणावर झोप, विहारीतील अंघोळ अश्या ग्रामीण जीवनशैलीचा उपभोग घेता येईल. 2009 मध्ये आलेल्या फार्म-विले नावाचा एक गेम सोशल मिडिया मध्ये चांगलाच गाजला होता. त्यामध्ये गेम खेळणारी व्यक्ती बियाणे घेण्यापासून, शेतीची सर्व कामे करून ते बाजारपेठे मध्ये विक्री करण्यापर्यंतची सर्व कामे ही आभासीपणे (virtual) करू शकत होती. अश्या आभासी खेळांपेक्षा प्रत्यक्ष शेतात जाऊन त्या गोष्टी करण्यामध्ये अधिक आनंद मिळेल.

सरकारी यंत्रणेपुढे ग्रामविकास हे एक प्रमुख उद्दिष्ट असते, कारण आजही भारतात ७० ते ८०% लोक हे शेती करतात. पर्यटकांनी कृषी पर्यटनास साथ दिली तर सरकारी योजनेमधून गावाचा-परिसराचा,

रस्ते-पाणीपुरवठा यासारख्या विकासावर भर देऊन एकूण गाव, राज्य व देशांतर्गत उत्पादन वाढीसाठी प्राधान्य दिले जाईल.

भारतात ६ लाखांपेक्षा जास्त खेडी आहेत, एक प्रकारे भारत हा खेड्यांचा देश म्हणुन ओळखला जातो. इथल्या प्रत्येक गावाची संस्कृती वेगवेगळी आहे. गावातील प्रत्येक घरातील जेवणाची वेगवेगळी चव आहे. वर्षभरात साजरे होणारे गावोत्सव, सनउत्सव, रूढी परंपरा या सर्वात निसर्गपूरक जीवनशैलीच्या संस्काराचा गाभा आहे. गावांची अर्थव्यवस्था हि शेती व शेतीपूरक जरी असली, तरी अनेक गावं आता कात टाकत आहेत. शहराजवळची गावं झपाट्याने शहरीकरणात घुसत आहेत. काही ठिकाणी औद्योगिक वसाहती उभ्या राहिल्याने, अर्थकारण बदलले आहे. शेतीवरचे अवलंबित्व कमी व्हावे यासाठी विविध प्रयत्न होताना दिसतात. अर्थात देशपातळीवर विचार करता याचे प्रमाण नगण्य आहे. महाराष्ट्रात ३६ जिल्हे, ३५५ तालुके आणि ४३७२२ गावं आहेत. राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी आहे. त्यापैकी ४५% लोकं शहरात राहतात म्हणजे उरलेले ५५% लोकं निमशहरी/ग्रामीण भागात/गावात राहतात. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशात पहिल्या क्रमांकाची आहे. तसेच शहरीकरणाच्या अंगाने महाराष्ट्र, देशातील सर्वात जास्त शहरीकरण झालेले राज्य आहे. देशात, महाराष्ट्राचा लोकसंख्येच्या दृष्टीने २ रा आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने ३ रा क्रमांक आहे. देशाच्या सकल उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा हा १४.४ % एवढा आहे. ग्रामीण महाराष्ट्रात राहणाऱ्या ५५% लोकांची अर्थव्यवस्था हि शेती आधारित आहे. एकूण शेतकऱ्यांच्या ८०% शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. हे शेतकरी राज्यभर, कोकण, दक्षिण महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र/खानदेश, मराठवाडा आणि विदर्भ असे विखुरलेले आहेत. अशा शेतीतून जगण्यापुरता पैसा मिळेल, प्रगतीसाठी लागणारा पैसा कमवायला शेतीला काहीतरी पूरक किवा जोड व्यवसायाची साथ द्यावी लागते. मग त्यात शेळीपालन, गायी म्हशी पालन, कुक्कुटपालन, रेशीमउद्योग, मधुमक्षिकापालन, छोटेमोठे शेतीपूरक कुटिरोद्योग यांची जोड देत, शेतकरी आपलं जगणं शाश्वत करू पाहतात. कुठल्याही व्यक्तीच्या किवा समाजाच्या विकासाचा प्रवास हा मास्लोव थियरीच्या पिरामिडच्या मार्गानेच होत असतो. त्यातली पहिली पायरी पैसा आहे, जो शेतीत काम करून अगदी शाश्वत नसला तरी जगण्यापुरता [कधी कधी तोही नाही] मिळवता येतो. पण पुढचे प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा या दोन गोष्टी शेतकरीवर्गाला मिळण्यात, आताच्या सामाजिक संरचनेत खुप अडचणी आहेत. याचा परिपाक म्हणुन शेतकरी आत्महत्या करण्यापर्यंत पोहोचला आहे. पावसावर अवलंबून असलेली शेती, व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव, अद्यावत तंत्रज्ञान व माहितीचा अभाव, शेती शिक्षण, संशोधन याचा प्रसार व शेतकरी यांच्यात असलेले अंतर, पिकवलेल्या शेतमालाची किंमत ठरवणे हातात नसणे, नाशवंत शेतमालाचा विनियोग, त्याची प्रक्रिया यासाठीच्या पायाभूत सुविधांचा अभाव, खेळत्या भांडवलाचा अभाव अन यावर कडी म्हणजे सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव या सगळ्या अडचणींमुळे लोक शेती सोडून हाताला मिळेल ते काम करायला तयार होत आहेत. पण सगळ्यांनाच काम मिळते असे नाही आणि सगळ्यांनीच शेती सोडुन देणं शक्यही नाही. अशा परिस्थितीत एक अशी गोष्ट आहे कि जी शेतकरी वर्गाला, ग्रामीण भागात रहात असणाऱ्या तरुण तरुणींना, महिलांना, छोट्या मोठ्या कलाकारांना, कारागिरांना फ़क्त उपजीविकेसाठीच नाही तर प्रगतीसाठी पैसा, कलेला, त्यांच्या कामाला प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीही मिळवून देऊ शकेल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य त्यांच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, सध्या कृषी पर्यटन व त्यामधून ग्रामीण जीवनाला योग्य कलाटणी मिळालेली आहे. ग्रामीण भागात रोजगार वाढीच्या संधी वाढल्या आहेत. आर्थिक मंदीमुळे औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी संकुचित होत जात असताना दुसरीकडे शेतीच्या अडचणी संपताना दिसत नाहीत. राज्याची ५५% लोकसंख्या ज्या ग्रामीण भागात राहते, तिथून काही लोकांनी शेती सोडून इतर क्षेत्रातील रोजगार शोधत स्थलांतर केले. सगळ्यांनाच असं करणं शक्य नाही, अशा वेळेस ग्रामीण भागातील लोकांनी शेतीतूनच समृद्धीचा मार्ग शोधायला सुरवात

केली. त्या शेतीला जेव्हा पर्यटनाची जोड मिळते तेव्हा संधीचं एक मोठं आकाश मोकळं होतं. इतर पर्यटन संकल्पनांसारखीच हि एक माती आधारित पर्यटन संकल्पना आहे, ज्याला कृषी पर्यटन, शेती पर्यटन, फार्म हाउस पर्यटन, ग्रामीण पर्यटन, गाव पर्यटन, कंट्रीसाईड टुरिझम, ऑफबीट टुरिझम अशी वेगवेगळी नावं आहेत. पर्यटनाच्या साथीने शेतीआधारित अर्थव्यवस्थेत एक शाश्वत विकासाचे परिमाण लाभेल. गावाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासात पर्यटनाचा असा मोलाचा वाटा ठरू शकेल. जेव्हा आपण देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पहातो तेव्हा गावांना स्वयंपूर्ण करणे हा त्यातला प्रभावी मार्ग आहे असे वाटायला लागते. महात्मा गांधीना जो खेड्यांचा विकास अपेक्षित होता त्याला पर्यटनातून प्रत्यक्षात उतरवायला मदतच होईल.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. विनोद पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या वेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विध्यार्थिनी उपस्थित होते.

डॉ. विनोद पवार
(भूगोल विभाग)

प्राचार्य

# *Photographs*




